दि. 15/06/2023

# १६ वर्षांपासून फरार असलेला आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

हिंगोली- मागील १६ वर्षांपासून गुन्ह्यातील फरार असलेला आरोपी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने कळमनुरी येथून पकडला आहे.

दि. १३ जून रोजी पोलीस ठाणे देगलुर गुर नं. ५५/२००७ या गुन्हयात फरार असलेला आरोपी नामे सर्जे राव निळबा चव्हाण रा.तमलुर ता. देगलुर जि. नांदेड हा सध्या कळमनुरी तालुक्यातील धानोरा येथे असल्याची माहिती स्थागुशाचे पो.नि. द्वारकादास चिखलीकर यांना मिळाली त्यावरुन त्यांनी एक पथक तयार करुन धानोरा ता. कळमनुरी येथे पाठविले. सदर पथक धानोरा येथे जाऊन मिळालेल्या महितीप्रमाणे सदर इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव-गाव विचारले असता त्याने त्याचे सर्जेराव निळबा चव्हाण (वय ६० वर्षे रा. तमलुर जि. नांदेड ह.मु. धानोरा ता. कळमनुरी जि. हिंगोली) असे सांगितले. त्यास ताब्यात घेऊन अधिक विचारपुस करता त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबुली दिली आहे. पुढील कायदेशीर कारवाईसाठी पो.स्टे. देगलुर यांचे ताब्यात दिले आहे. नमुद आरोपी हा १६ वर्षांपासून फरार होता. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, पो.उपनि. सचिन सोनवणे, गुंडेराव करले, अफजल पठाण, देवा चव्हाण यांनी पार पाडली आहे.